महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/प्रवेश मान्यता/शै.वि.-३/२०२३/ 3067
दिनांक : २९.०७.२०२४ 29 JUL 2024

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ : १.संचालनालाचे पत्र क्र.२/एनजीसी/Intake Approval /२०२४/४४० दि.०३.०७.२०२४**
**२. संचालनालाचे पत्र क्र.२/एनजीसी/Intake Approval /२०२४/५०८ दि.१९.०७.२०२४**
**३. संचालनालाचे पत्र क्र.२/एनजीसी/Intake Approval /२०२४/५२८ दि.२६.०७.२०२४**

उपरोक्त विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबत संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या https://ugpg24.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करुन दि.१९ जुलै २०२४ पर्यत ऑनलाईन पध्दतीने सादर करणेविषयी संदर्भ क्र. ०१ अन्वये व दि. २६ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र. ०२ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

सबब अद्यापही काही संस्थांनी माहिती अद्ययावत केलेली नाही. तसचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे. प्रवेश प्रक्रियेकरीता दिलेल्या मुदतवाढीस अनुसरुन सर्व संस्थांनी **दि.३१ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५:०० वाजयेपर्यंत** माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे.

ज्या संस्था अशी माहिती अद्ययावत करणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

महत्वाचे परिपत्रक/कालमर्यादित

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२४/५२८ दिनांक : 26 JUL 2024

प्रति,

प्राचार्य / संचालक

सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र - १२२४/प्र.क्र.०३/कें.प्र.प्र./२०२४/९६८,दिनांक १०.६.२०२४

२)संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/Intake Approval/२०२४/४४०, दिनांक : ३.७.२०२४

३)संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/Intake Approval/२०२४/५०८, दिनांक : १९.७.२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्याने संस्थेबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या https://ugpg२४.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करून दि. १९ जुलै २०२४ व तद्नंतर दि.२६ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र अद्यापही काही संस्थांनी त्यांची माहिती अद्ययावत केलेली नाही. तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रवेश प्रक्रियेकरीता विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे. प्रवेश प्रक्रियेकरीता दिलेल्या मुदतवाढीस अनुसरून सर्व संस्थांनी दिनांक ३१.७.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे.

ज्या संस्था अशी माहिती अद्ययावत करणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सादर

२. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि. १ ऑगस्ट, २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

४. अध्यक्ष / सचिव, सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

५. कार्यासनं अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.